**ठळक बातम्या**

- १८ व्या लोकसभेची अधिसूचना प्रसिद्ध झाल्यानं लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता संपुष्टात
- राज्य विधीमंडळाचं पावसाळी अधिवेशन २७ जून पर्यंत पुढे ढकललं
- उद्धव ठाकरेंना NDA त सहभागी होण्याची विनंती केल्याच्या चर्चा भाजपा नेते सुधीर मुनगंटीवार यांनी फेटाळल्या, राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार शरद पवारांच्या संपर्कात नसल्याचं सुनील तटकरे यांचं स्पष्टीकरण
- छत्रपती शिवाजी महाराज यांचा 351 वा राज्याभिषेक सोहळा राज्यभरात उत्साहात

  **आणि**

- नैऋत्य मोसमी पाऊस राज्यात दाखल, येत्या ३-४ दिवसात मुंबईत येण्याचा हवामान विभागाचा अंदाज

**<><><><><>**

निवडणूक आयोगानं आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेवून १८ व्या लोकसभेत निवडून आलेल्या सदस्यांची यादी असलेली अधिसूचनेची प्रत त्यांच्याकडे सुपूर्द केली. याबरोबरच निवडणूक जाहीर झाल्यापासून लागू झालेल्या निवडणूक आचारसंहितेचा कालावधी संपुष्टात आला आहे.

ही संपूर्ण निवडणूक प्रक्रिया यशस्विरित्या पूर्ण केल्याबद्दल राष्ट्रपतींनी निवडणूक आयोगाचं अभिनंदन केलं.

**<><><><><>**

प्रधानमंत्री म्हणून नरेंद्र मोदी यांचा सलग तिसरा शपथविधी येत्या ९ तारखेला होण्याची शक्यता असून, त्यादृष्टीनं तयारी सुरु आहे. नवी दिल्लीतल्या राष्ट्रपती भवनात होणाऱ्या या शपथविधी समारंभाच्या वार्तांकन आणि प्रसारणासाठीच्या तयारीचा आढावा माहिती आणि प्रसारण सचिव संजय जाजू, प्रसार भारतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी गौरव द्विवेदी, आकाशवाणीच्या महासंचालक मौशुमी चक्रवर्ती, दूरदर्शनच्या महासंचालक कांचन प्रसाद इत्यादी ज्येष्ठ अधिकाऱ्यांनी आज घेतला.

**<><><><><>**

राज्य विधीमंडळाचं पावसाळी अधिवेशन १० जून ऐवजी २७ जूनपर्यंत पुढे ढकलण्याचा निर्णय राज्य सरकारनं आज घेतला. मुंबईत मंत्रीमंडळाची बैठक झाल्यानंतर वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी ही माहिती दिली. पाणी टंचाईच्या समस्येवर अधिक वेगानं तोडगा काढावा असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी या बैठकीत प्रशासनाला दिले. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या बैठकीला व्हीडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे उपस्थित होते.

उद्धव ठाकरे यांनी राष्ट्रीय लोकशाही आघाडीत सहभागी व्हावं यासाठी भाजपाच्या नेत्यांनी ठाकरे यांना विनंती केल्याची चर्चा मुनगंटीवार यांनी फेटाळून लावली. विधानपरिषद निवडणुकीसंदर्भात महायुतीच्या पक्षांमध्ये एकमत व्हावं, यासाठी चर्चा सुरू आहे, असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर शिवसेनेच्या सर्व नवनिर्वाचित खासदारांशी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज मुंबईत चर्चा केली. निवडणुकीत

नक्की कुठे कमी पडलो याचाही आढावा त्यांनी या बैठकीत घेतला. वर्षा निवासस्थानी झालेल्या या बैठकीला पक्षाचे नवनिर्वाचित खासदार आणि इतर नेते उपस्थित होते.

दरम्यान केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी आज मनसे प्रमुख राज ठाकरे यांची मुंबईत त्यांच्या घरी सदिच्छा भेट घेतली.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या खासदारांनीही आज मुंबईत उद्धव ठाकरेंची भेट घेतली.

**<><><><><>**

उपमुख्यमंत्री आणि भाजप नेते देवेंद्र फडणवीस आज दिल्लीला रवाना झाले. काल त्यांनी उपमुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देण्याची तयारी दर्शवली होती. त्यासंदर्भात दिल्लीत वरिष्ठ नेत्यांशी ते चर्चा करतील, अशी शक्यता आहे. प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळेही त्यांच्यासोबत दिल्लीला गेलेत.

लोकसभा निवडणुकीत मुंबईमध्ये भाजपाला मिळालेल्या यशा-अपयशाबाबत आज मुंबईतले भाजपाचे माजी खासदार, आमदार, माजी आमदार, मुंबई भाजपाचे माजी अध्यक्ष यांची मुंबईचे प्रदेशाअध्यक्ष आशिष शेलार यांनी बैठक घेतली. या बैठकीत निवडणुकीतल्या कामगिरीचं विश्लेषण झालं आणि आगामी नियोजनाबाबत चर्चा झाल्याची माहिती शेलार यांनी दिली.

**<><><><><>**

राज्यात केंद्र सरकारपेक्षा राज्य सरकारच्या विरोधात अधिक नाराजी असून येत्या विधानसभेत सत्ताधाऱ्यांना याचा मोठा फटका बसेल, असं राष्ट्रवादी काँग्रेस

शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी म्हटलं आहे. ते आज मुंबईत वार्ताहर परिषदेत बोलत होते. यावेळी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांच्यासह अनेक नेते उपस्थित होते. लोकसभा निवडणुकीत पक्षाचे निवडून आलेले उमेदवार शेतकऱ्यांच्या कांदा, सोयाबीन, कापूस याप्रश्नांसह महागाई, जीएसटी यासारख्या सामान्य माणसांच्या प्रश्नांवरही आवाज उठवतील, असं ते म्हणाले.

अजित पवार गटाच्या आमदारांना पक्षात परत घेण्याबाबत योग्यवेळी भाष्य केलं जाईल, असंही जयंत पाटील यांनी स्पष्ट केलं. आमचा पक्ष आता स्वच्छ नेत्यांचा असून येत्या विधानसभा निवडणुकीतही तरुणांना, तसंच स्वच्छ प्रतिमा असलेल्या उमेदवारांना संधी दिली जाईल, असं त्यांनी सांगितलं.

पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक येत्या ९ तारखेला मुंबईत होईल, तर पक्षाचा स्थापना दिवस १० जूनला अहमदनगर इथं मोठ्या उत्साहात साजरा केला जाईल, अशी माहिती त्यांनी दिली.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीतल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या कामगिराचा आढावा घेण्यासाठी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांनी आज मुंबईत पक्षाच्या वरीष्ठ नेत्यांची बैठक घेतली. सर्व ४८ मतदारसंघाबाबत या बैठकीत चर्चा झाल्याचं राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी बैठकीनंतर बातमीदारांना सांगितलं.

राष्ट्रवादी काँग्रेसचे काही आमदार शरद पवार यांच्या संपर्कात असल्याचं वृत्त त्यांनी फेटाळून लावलं. पक्षाच्या सर्व आमदारांचा अजित पवार यांच्या नेतृत्वावर

विश्वास असून येत्या १० तारखेला मुंबईत पक्षाच्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमाला राज्यभरातले सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते येणार आहेत, असं त्यांनी सांगितलं.

राज्य मंत्रिमंडळाच्या विस्ताराबद्दल या बैठकीत कसलीही चर्चा झाली नाही, याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि अजित पवार निर्णय घेतील, असं तटकरे म्हणाले.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदारांची बैठक आज मुंबईत सुरु आहे. अजित पवार यांच्यासह प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे, इत्यादी नेते आणि आमदार या बैठकीला उपस्थित आहेत.

**<><><><><>**

सांगलीतून अपक्ष म्हणून निवडून आलेल्या विशाल पाटील यांनी काँग्रेस पक्षाला पाठिंबा दिला आहे. आज त्यांनी नवी दिल्लीत काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, काँग्रेस नेत्या सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांची भेट घेतली आणि पाठिंब्याचं पत्र त्यांना सोपवलं. आमदार विश्वजित कदम यावेळी त्यांच्यासोबत होते.

**<><><><><>**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचा 351 वा शिवराज्याभिषेक सोहळा आज रायगडावर मोठ्या उत्साहात साजरा झाला. छत्रपती संभाजी राजे यांच्या उपस्थितीत मानवंदना देण्यात आली. संपूर्ण रायगडाला फुलांनी सजवण्यात आलं होतं. यावेळी देशभरातून लाखो शिवभक्त रायगडावर उपस्थितीत होते. यावेळी पारंपारीक खेळ, पालखी सोहळा, शाहीरी नजराणा, आदी कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं.

**कोल्हापूर** इथं नवीन राजवाड्याच्या प्रांगणात झालेल्या सोहळ्याला करवीरनगरीतले हजारो लोक उपस्थित होते.

**पालघर** शहरात किल्ले रायगडावरच्या शिवराज्याभिषेक सोहळ्याचा देखावा आजपासून तीन दिवस नागरिकांना पाहता येईल.

**धुळे** जिल्ह्यात छावा संघटनेच्या वतीनं शिवराज्याभिषेक सोहळा साजरा करण्यात आला. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला दुग्ध अभिषेक तसंच पंचामृतानं अभिषेक करून अभिवादन करण्यात आलं.

**परभणी** इथल्या जिल्हा परिषदेच्या कार्यालयात शिवरायांच्या पुतळ्याचं पूजन करण्यात आलं.

**धुळे** जिल्ह्यात छावा संघटनेच्या वतीनं शिवराज्याभिषेक सोहळा साजरा करण्यात आला. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला दुग्ध अभिषेक तसंच पंचामृतानं अभिषेक करून अभिवादन करण्यात आलं.

**नांदेड** जिल्ह्यात भगव्या ध्वजासह स्वराज्य गुढी उभारली होती.

**<><><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदच्चंद्र पवार पक्षाचे नवनिर्वाचित खासदार निलेश लंके यांचे निकटवर्तिय राहुल झावरे यांच्यावर आज अहमदनगर जिल्ह्यातल्या पारनेर इथं प्राणघातक हल्ला झाला. झावरे यांना अहमदनगरमधल्या रुग्णालयात अतिदक्षता विभागात दाखल करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

राज्यपाल रमेश बैस यांच्या हस्ते राज्यातल्या ११५ पोलीस अधिकारी आणि पोलीस अंमलदारांना आज पोलीस पदक प्रदान करण्यात आले.  यात ३० पोलीस अधिकारी आणि जवानांना पोलीस शौर्य पदक, सात पोलीस अधिकारी आणि जवानांना उल्लेनीय सेवेबद्दल राष्ट्रपती पोलीस पदक आणि ७८ पोलीस अधिकारी आणि अंमलदारांना गुणवत्तापूर्ण सेवेसाठी पोलीस पदकं प्रदान करण्यात आली.

**<><><><><>**

नैऋत्य मोसमी पाऊस आज राज्यात दाखल झाला. तळ कोकणात रत्नागिरी, तसंच सोलापूरमधे मान्सूनचं आगमन झाल्याचं हवामानशास्त्र विभागाचे वरिष्ठ वैज्ञानिक कृष्णानंद होसाळीकर यांनी म्हटलं आहे.

**होल्ड - बाइट**

येत्या दोन दिवसांत राज्यात बऱ्याच ठिकाणी सोसाट्याचे वारे आणि मेघगर्जनेसह पावसाची शक्यता असून, कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी मुसळधार पाऊस पडेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.